प्रकरण सहावे

# उपसंहार

# प्रकरण सहावे

# उपसंहार

**प्रस्तावना -**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणात समाजवादी पक्ष आणि त्या पक्षातून निघालेल्या राजकीय पक्षांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. भारतातील समाजवादी चळवळीमध्ये महाराष्ट्रातील समाजवादी नेत्यांनी आणि विचारवंतांनी महत्वाची भूमिका बजावली.

महाराष्ट्रातील लोकशाही विचारामध्ये तीन प्रवाह दिसतात.

१. गांधी आणि मार्क्स यांच्या विचारांचा समन्वय करणारा प्रवाह.

२. डॉ. लोहिया यांनी मांडलेल्या वर्ग आणि जाती याबाबतच्या विचारांचा प्रवाह.

३. अशोक मेहता यांचा पाश्चिमात्य लोकशाही समाजवादी विचारांनी प्रभावीत झालेला प्रवाह.

महाराष्ट्राच्या राजकारणात समाजवादी पक्षाने महत्वाची भूमिका बजावली. या पक्षातून अशोक मेहता, जॉर्ज फर्नांडीस, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, मधू लिमये, मधू दंडवते इ. राष्ट्रीय नेते निर्माण झाले. १९४२ ची चलेजाव चळवळ, महाराष्ट्रातील गोवा मुक्ती चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, भूमिहीन शेतकरी कामगार चळवळ, जमीन बळकाऊ चळवळ. या चळवळींमध्ये समाजवादी पक्षाने व प्रजासमाजवादी पक्षाने महत्वाची भूमिका बजावली. याचबरोबर राष्ट्रसेवा दल, युवक क्रांती दल, हिंद मजूर सभा इ. संस्थांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये वैचारिक नेतृत्व प्रदान करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये साने गुरुजींनी स्थापन केलेल्या 'साधना' साप्ताहिकाची भूमिका महत्वाची होती.

महाराष्ट्रातील समाजवादी नेत्यांनी मोलाचे विचार मांडले. यामध्ये आचार्य जावडेकर, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता, स. ज. भागवत, साने गुरुजी यांचा समावेश होतो. एस. एम. जोशी व ना. ग. गोरे यांनी पक्षाला नवे नेतृत्व दिले.

भारतातील व महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीचा इतिहास हा समाजवादाच्या वैचारिक क्रांतीचा इतिहास आहे. या काळात समाजवादी पक्षाने आपले दरवाजे नवविचारांसाठी सदैव उघडे ठेवले. नवनवीन विचारांना आत्मसात करण्याचे धारिष्ट्य वेळोवेळी दाखवले ही वैचारिक गतिमानता हा भारतीय व महाराष्ट्रातील समाजवादी आंदोलनाचा व विचारांचा एक अमूल्य असा ठेवा आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये महाराष्ट्रातील विचारवंतांनी समाजवादी विचारांना जे योगदान केले त्याचा अभ्यास करण्यात आला आहे. यात मुख्यतः आचार्य जावडेकर, अशोक मेहता व साने गुरुजी यांच्या विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

या प्रबंधाचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे.

१. महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांची व्यवस्थित मांडणी करणे.

२. महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांनी भारतातील समाजवादी विचारांना जे योगदान केले त्याचा अभ्यास करणे.

या प्रबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. विविध ग्रंथ, वैचारिक लेख, साप्ताहिके, पुस्तिका इ.चा संदर्भ घेण्यात आला आहे.

## अ. सारांश -

पहिल्या प्रकरणात भारतातील समाजवादी पक्षाची स्थापना व विकास यांची चर्चा करण्यात आली आहे. १९३४ साली जयप्रकाश, नरेंद्र देव, अच्युतराव पटवर्धन व युसूफ

मेहेरअली यांनी कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९४२ च्या चळवळीत या स्र्व नेत्यांनी कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना अटक झाल्यानंतर चळवळीचे नेतृत्व केले. १९४८ साली समाजवादी पक्ष हा स्वतंत्र राजकीय पक्ष जयप्रकाश नारायण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाला. १९५२ च्या निवडणूकीत समाजवादी पक्षाचा मोठा पराभव झाला. त्यानंतर पक्षामध्ये सातत्याने फाटाफूट होत राहिली. १९६३ साली अशोक मेहता यांनी पक्षाचा त्याग केला. शेवटी १९७७ साली हा पक्ष आपल्या एकोणतीस वर्षाच्या कारकिर्दीनंतर जनता पक्षात विलीन झाला.

या प्रकरणात महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाच्या कार्याची थोडक्यात चर्चा करण्यात आली आहे. अखिल भारतीय स्तरावर कार्य करणाऱ्या समाजवादी नेत्यांच्यामध्ये मुख्यतः महाराष्ट्रातील नेत्यांचा समावेश होता. त्यामध्ये अच्युतराव, मेहरअली, अशोक मेहता, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, मधू लिमये, मधू दंडवते इ.चा समावेश होतो. महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीत वैचारिक क्षेत्रात भरीव असे कार्य केले. त्यामध्ये आचार्य जावडेकर, अशोक मेहता, साने गुरुजी व आचार्य भागवत यांचा समावेश होता.

## २) आचार्य जावडेकर व त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान -

म. गांधींनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढयाचा जो कार्यक्रम देशापुढे ठेवला तो टिळकांच्या चतुःसूत्री कार्यक्रमाचेच विकसीत रुप होते. परंतु म. गांधींचा कार्यक्रम तथाकथित टिळक अनुयायांना मान्य नव्हता. त्यांच्याशी वैचारिक मतभेद पुकारुन महाराष्ट्रातील सुशिक्षीत वर्गात गांधी विचाराला प्रतिष्ठा मिळवून देण्याची फार मोठी कामगिरी आचार्य जावडेकरांनी आपल्या लेखनाने व विचारांनी बजावली. १९३० च्या सत्याग्रहात सहभागी झाल्याबद्दल त्यांना कारावासाची शिक्षा झाली आणि त्यांना रत्नागिरी व नाशिकच्या तुरुंगात डांबण्यात आले होते. तेथे त्यांनी सखोल वाचन व चिंतन करुन

मार्क्सवाद व गांधीवाद याचा समन्वय होऊ शकतो याचा निर्वाळा दिला. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेस समाजवादी पक्षाला त्यांनी वैचारिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले.

आचार्य जावडेकरांनी स्वतंत्र प्रज्ञेने गांधीवादाची मांडणी केली. त्यात त्यांनी धर्म, राजकारण, राजकीय अहिंसा व सत्याग्रह यांचा उहापोह केला. आचार्यांनी मार्क्सवादाची स्वतंत्रपणे चिकित्सा केली. मार्क्सवाद चार सिध्दांत मांडतो असे आचार्यांचे मत आहे.

१. विश्वातील सर्व घटना एकमेकांशी संबंधित असतात.

२. विश्वातील सर्व घटनात गतिमानता आहे.

३. सर्व घटना द्वंद्वात्मक असतात.

४. बौध्दिक आंदोलनाचा सिध्दांत.

आचार्य जावडेकरांनी मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचीसुध्दा चिकित्सा केली आणि गांधी व मार्क्स यांच्यातील साम्यस्थळे शोधून त्यांचा समन्वय करण्यसाचा प्रयत्न केला. यातूनच त्यांनी 'सत्याग्रही समाजवाद' ही संकल्पना मांडली आहे.

महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांत या तत्वज्ञानाने मोलाची भर घातली आहे आणि भारतातील राष्ट्रवादाला सत्याग्रही समाजवादाचे अधिष्ठान देण्याचा प्रयत्न आचार्य जावडेकरांनी केला आहे.

आचार्य जावडेकरांनी डॉ. लोहिया यांच्या पंचमढी अधिवेशनातील भाषणाची स्वतंत्रपणे मीमांसा केली आहे.

### ३) साने गुरुजींचे लोकशाही समाजवादाचे विचार -

साने गुरुजींनी विद्यार्थी दशेत असतानाचा स्वातंत्र्य लढयामध्ये भाग घेतला होता. १९३२ साली त्यांना नाशिकच्या तुरुंगात टाकण्यात आले होते कामगार शेतकरी लढयामध्ये

त्यांचा मोठा सहभाग होता. विशेषतः खानदेशातील शेतकरी व कामगारांच्या चळवळीत त्यांचे अनन्यसाधारण असे योगदान आहे. त्यांच्या प्रेरणेनेच संयुक्त खानदेश कामगार फेडरेशनची स्थापना झाली होती. साने गुरुजी काँग्रेसचे खंदे कार्यकर्ते होते. पण पुढे ९ जुलै, १९३९ रोजी त्यांनी डाव्या विचारसरणीचा पुरस्कार केला. काही काळानंतर कम्युनिष्टांच्याबरोबर काम केल्यानंतर त्यांचा भ्रमनिरास झाला आणि मधू लिमयेंच्या प्रभावातून ते समाजवादी चळवळीकडे व पक्षाकडे आकृष्ट झाले ते शेवटपर्यंत. त्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षासही चांगले सहकार्य केले. विशेषतः राष्ट्रसेवा दलाच्या कार्यात साने गुरुजींनी जीव ओतून काम केले. राष्ट्रसेवादल व साने गुरुजी यांचे अतूट नाते निर्माण झाले. समाजवादी पक्षाचे ते सभासद झाले नाहीत पण समाजवादी पक्षाच्या ध्येयधोरणाचा त्यांनी सतत पुरस्कार केला. साने गुरुजींनी 'साधना' नावाचे साप्ताहिक काढले. त्यापूर्वी काँग्रेस साप्ताहिकाचे त्यांनी संपादन केले होते. १५ ऑगस्ट, १९४८ रोजी गुरुजींनी 'साधना' साप्ताहिक सुरु केले ते आजतागायत सुरु आहे. साने गुरुजींच्या आंतरभारती विचारांचे ते एक माध्यम बनले. साने गुरुजी हे गांधीवादाचे व समाजवादाचे समर्थक होते.

भारतीय धर्म, परंपरा व संस्कृती याविषयी त्यांनी नव्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. त्यांनी भारतीय संस्कृती हे एक महत्वाचे पुस्तक लिहिले आहे. संस्कृती आणि धर्म यांचा समाजवादी अन्वयार्थ सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

### ४) अशोक मेहता यांचे लोकशाही समाजवादाचे विचार -

अशोक मेहता यांनी वयाच्या १७ व्या वर्षापासूनच राष्ट्रीय आंदोलनात भाग घेण्यास त्यांनी आरंभ केला. ते मूलतः लोकशाहीवादी आणि व्यक्तिस्वातंत्र्यवादी होते. स्वातंत्र्य चळवळीत त्यांना अनेक वेळा तुरुंगात जावे लागले. तुरुंगात असतानाच त्यांनी जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, प्रभूतींबरोबर १९३४ मध्ये काँग्रेस सोशॅलिष्ट पार्टी स्थापन

केली. त्यांनी 'हिंद मजदूर सभा' ही संस्था स्थापनेत पुढाकार घेतला होता. त्यांनी 'काँग्रेस सोशॅलिष्ट विकली'चे संपादन केले. त्यांच्या जीवनाचे चार भाग पडतात. पहिल्या भागामध्ये ते स्वातंत्र्य चळवळीमध्ये आणि काँग्रेस समाजवादी पक्षामध्ये सामील झाले आणि त्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या राजकीय जीवनाचा दुसरा टप्पा १९४८ साली समाजवादी पक्ष स्थापन झाल्यानंतर झाला. त्यांनी कामगार चळवळीत मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या आयुष्याच्या तिसऱ्या टप्यात त्यांनी प्रजा समाजवादी पक्षाचा आपल्या अनुयायांसह त्याग केला आणि ते १९६३ साली काँग्रेस पक्षात सामील झाले.

**समाजवाद -** त्यांच्या मते समाजवादामुळे निर्माण होणारी प्रेरणा, समाजवादाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अवलंबावयाचा मार्ग, नेतृत्वाविषयीची भूमिका, सरकारकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि समाजवादाची व्याप्ती व स्वरुप अशा पाच दृष्टीकोनातून समाजवादाचा विचार केला पाहिजे. अशोक मेहता म्हणतात की, समाजावादाचे प्रकार हे समाजवादी चळवळीतील निरनिराळे टप्पे आहेत व लोकशाहीपूर्ण समाजवादातच समाजवादाची खरी जोपासना होऊ शकते. अशोक मेहता यांनी आपल्या लोकशाही समाजवाद या प्रकरणात मार्क्स व लेनिन यांच्या विचारांचा परामर्ष घेतला आहे.

**समाजवादाचे अर्थशास्त्र -** समाजवादी अर्थशास्त्र उदयास आल्याशिवाय समाजवादी समाजाची चित्रे रंगवीत बसणे स्वप्नवादी ठरेल. मार्क्सच्या काळात जे बरोबर होते ते आधुनिक काळात समर्थनीय ठरणार नाही. तथापि ते पुढे म्हणतात की मार्क्सने भांडवलशाहीतील जे अंतर्विरोध दाखवून दिले त्यामुळेच भांडवलशाहीतील आर्थिक अरिष्टांची अपरिहार्यता स्पष्ट झाली. समाजवादाचे अर्थशास्त्र मांडताना अशोक मेहता यांनी मार्क्स, लेनिन, बुखारीन, ट्रॉटस्की यांच्या विचारांची मीमांसा केली आहे.

**समाजवाद आणि संस्कृती** - अशोक मेहता म्हणतात की, मार्क्सने संस्कृतीसंबंधाने जो सिध्दांत मांडला आहे तो सर्वसाधारणपणे इतिहासजन्य भौतिकवाद किंवा इतिहासाची अर्थशास्त्रप्रणीत संगती म्हणून ओळखला जातो. समाजाच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादक शक्तींचे सामर्थ्य आणि मालकी हक्कानुसार पडणारी वर्गवारी यावरुन त्या समाजातील संस्कृतीचे निकष ठरतात. तसेच संस्कृती इतरांच्या श्रमावर जगणाऱ्या समाजातील मूठभर मिरासदारांची मक्तेदारी होऊन बसते. आपल्या लोकशाही समाजवादावरील भाषणामधून अशोक मेहता यांनी संसदीय लोकशाही समाजवादाची मांडणी केली आहे.

## ५) महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचार - एक चिकित्सक अभ्यास -

भारतातील लोकशाही समाजवादी विचारांमध्ये महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी नेत्यांचे व विचारवंतांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी भारतीय परिस्थितीत हा विचार विकसीत करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तूत प्रबंधामध्ये याचा सविस्तरपणे अभ्यास करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांत आचार्य शं. द. जावडेकर, साने गुरुजी, अशोक मेहता यांचे महत्वाचे योगदान आहे. महाराष्ट्रातील काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेत अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, मधू लिमये यांचा महत्वाचा वाटा आहे. आचार्य जावडेकरांनी काँग्रेस समाजवादी पक्षाला वैचारिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. डॉ. लोहिया यांना महाराष्ट्रात अनुयायी मिळाले पण त्यांनी त्यांचा विचार पुढे नेण्यात मात्र फारशी कामगिरी बजावली नाही.

गोवा मुक्ती चळवळ व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांचा व कार्यकर्त्यांचा कस लागला. आणिबाणी विरुध्दच्या आंदोलनात महाराष्ट्रातील समाजवादी पक्ष अग्रेसर राहिला.

महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांमध्ये आचार्य जावडेकर यांनी सत्याग्रही समाजवादाची संकल्पना मांडून महत्वाचे योगदान केले. त्याचप्रमाणे श्री अशोक मेहता यांनी लोकशाही समाजवादाची संकल्पना विस्ताराने मांडली आणि भारतीय संदर्भामध्ये तिची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल याचे विवेचन केले. अशोक मेहता यांच्या विचारांवर पाश्चिमात्य वळणाच्या लोकशाही समाजवादी विचारांचा प्रभाव होता आणि भारतीय संदर्भामध्ये या विचारांची सखोल मांडणी सर्व समाजवादी विचारवंतांमध्ये फक्त अशोक मेहता यांनी केली.

अच्युतराव पटवर्धन यांचा 'लोकशाही समाजवाद' या विषयाचा व्यासंग मोठा होता. परंतु सक्रीय राजकारणातून निवृत्त झाल्यावर त्यांच्या एकूण विचारांवर जे. कृष्णमूर्ती यांचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यानंतर सामाजिक स्तरावर व्यापक प्रमाणात करावयाच्या बदलाऐवजी व्यक्तिच्या व्यक्तिमत्वामध्ये आणि विचारांमध्ये बदल करणे जास्त श्रेयस्कर आहे. त्यामुळे अच्युतराव पटवर्धन यांनी लोकशाही समाजवादाची तत्त्वज्ञानामध्ये क्षमता असूनही भर घातलेली दिसत नाही.

साने गुरुजींनी आपले विचार थोडक्यात व सूत्ररुपाने मांडले. त्याचा वैचारीकदृष्ट्या मोठा विकास करणे त्यांच्या हातून झाले नाही. शिवाय अशा प्रकारचे गंभीर खंडणमंडणात्मक लिखाण करण्याची त्यांची प्रकृती नव्हती. त्यांचा भर हा वर्णनात्मक लिखाणावर होता. विश्लेषणात्मक लिखाणावर नव्हता. परंतु परंपरेचासुध्दा नव्या विचारांचा कसा विचार केला जाऊ शकतो हे त्यांनी भारतीय संस्कृती या पुस्तकातून स्पष्ट केले.

डॉ. लोहिया यांच्या शिष्यांमध्ये प्रखर बुध्दीमत्ता असलेले शिष्य म्हणजे मधू लिमये, डॉ. लोहियांनी वर्ग-जात-भाषा-संस्कृती या सर्व क्षेत्रामध्ये मुलगामी अशी मांडणी केली. जात व भाषा या संदर्भातील मांडणी नवी होती. परंतु मधू लिमये यांनी महाराष्ट्राच्या संदर्भात याचा फारसा विकास केला नाही. खरे पाहता महाराष्ट्रात म. फुले, डॉ. आंबेडकर व इतर अनेक विचारवंतांनी याबद्दल अत्यंत मुलगामी असे विवेचन केले होते, परंतु या विचारांचा सांधा डॉ. लोहिया यांच्या विचारांशी जोडण्याचे काम फक्त मधू लिमये करु शकले असते. पण दुर्दैवाने त्यांनी ते काम न केल्याने महाराष्ट्रातील समाजवादी चळवळ एका महत्वाच्या वैचारिक योगदानाला मुकली.